# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १२ वा ❑ भारतीय सौर दिनांक २३ माघ शके १९४७, गुरूवार दि.१२ फेब्रुवारी २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## भिंतींनाच शाळा बनविणाऱ्या शिक्षिका: रूबल नागी

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

मुंबईतील शिक्षिका रुबल नागी यांनी भारताचं नाव पुन्हा एकदा जागतिक पातळीवर उज्वल केलं आहे.दुबई येथे झालेल्या वर्ल्ड गव्हर्नमेंट समिट दरम्यान त्यांना जगातील प्रतिष्ठित ग्लोबल टीचर प्राईज प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार GEMS एज्युकेशनने त्यांच्या १० व्या आवृत्तीत प्रदान केला. दुबईचे क्राउन प्रिन्स शेख हमदान बिन मोहम्मद बिन रशीद अल मकतूम यांनी रुबल नागी यांना हा सन्मान प्रदान केला.या पुरस्कारासोबत मिळणारी बक्षीस रक्कम आहे १ मिलियन डॉलर्स (सुमारे ९ कोटी रुपये) रुबल नागी यांनी शिक्षण कधीच वर्गापुरतं मर्यादित ठेवलं नाही. झोपडपट्टी, वंचित व दुर्लक्षित भागातील मुलांसाठी त्यांनी थेट भिंतींनाच शाळा बनवल्या. भित्तीचित्रांच्या माध्यमातून अक्षरओळख, गणित, स्वच्छता, आरोग्य आणि जीवनमूल्यांचे धडे देत त्यांनी हजारो मुलांपर्यंत शिक्षण पोहोचवलं. त्यांच्या कामाच्या केंद्रस्थानी ‘‘लिव्हिंग वॉल्स ऑफ लर्निंग‘‘ ही संकल्पना आहे, जी परिसरातील सोडून दिलेल्या किंवा दुर्लक्षित भिंतींवर रंगवलेली मोठी, परस्परसंवादी भित्तिचित्रे आहेत. ही भित्तिचित्रे मूलभूत साक्षरता आणि संख्याशास्त्र तसेच विज्ञान, स्वच्छता, इतिहास, पर्यावरणीय जागरूकता आणि सामाजिक जबाबदारी शिकवतात. त्यांचा ‘‘Living Walls of Learning’’ हा उपक्रम आज देशभरातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही आदर्श मानला जातो. शिक्षणआणि समाजकार्य करत या शिक्षिकेने समाज परिवर्तन घडवून आणलं. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे या बदलाची खरी ताकद या शिक्षिकेने दाखवून दिली.

आज जिथे अनेकजण फक्त आकडे, निकाल आणि पदांच्या मागे धावत आहेत, तिथे रुबल नागी यांनी ‘‘शिक्षण म्हणजे सामाजिक परिवर्तन’’ हे कृतीतून दाखवून दिलं. शिक्षक हा केवळ अभ्यासक्रम शिकवणारा नसून समाज घडवणारा शिल्पकार असतो, याचं हे जिवंत उदाहरण म्हणजे रूबल नागी आहे.शिक्षक हा भावी पिढीला ज्ञान, मूल्ये आणि शिस्त देऊन आदर्श समाज घडविणारा खरा शिल्पकार आहे ते केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, चारित्र्यनिर्मिती आणि प्रेरणादायी विचारसरणी रुजवतात समाजाला सकारात्मक दिशेने नेण्यात आणि राष्ट्राचे भवितव्य आकारण्यात शिक्षकांची भूमिका अमूल्य आहे.समाजाचा कणा म्हणून शिक्षक आपली भूमिका अत्यंत निष्ठेने पार पाडतात, ज्यामुळे पिढ्यानपिढ्या सुसंस्कृत समाज टिकून राहतो.हे रुबल नागी यांनी दाखवून दिले.

भारताच्या एका सामान्य शिक्षकाने केलेलं असामान्य कार्य आज संपूर्ण जगाने मान्य केलं आहे. हा सन्मान केवळ एका व्यक्तीचा नाही, तर देशातील प्रत्येक शिक्षकाचा, प्रत्येक शाळेचा आणि प्रत्येक विद्यार्थ्याचा आहे.

२४ वर्षांपूर्वी, रुबलने सुरुवातीला फक्त ३० मुलांसह एक कार्यशाळा चालवली. आता, रुबल भारतात अशी ८०० हून अधिक प्रशिक्षण केंद्रे चालवते, जिथे लाखो मुले शिक्षण घेत आहेत. तिची संस्था, रुबल नागी आर्ट फाउंडेशन, देशातील गरीब मुलांना मुख्य प्रवाहातील शिक्षणाशी जोडण्यासाठी काम करत आहे. ही केंद्रे अशा मुलांमध्ये शिक्षणाची भावना निर्माण करत आहेत ज्यांनी कधीही शाळा पाहिली नाही.

भिंतीना पाट्या बनवल्या

रुबल तिच्या शिकवण्याच्या पद्धतीसाठी देखील प्रसिद्ध आहे. ती सर्वत्र भिंतींवर शिकवू लागते. ती चित्रे काढते आणि या चित्रांचा वापर करून मुलांना गणित, इतिहास आणि इतर अनेक विषय शिकवते. पुरस्कार स्वीकारताना रुबल म्हणाली की हा सन्मान मिळणे ही तिच्या देशासाठी, भारतासाठी खूप अभिमानाची गोष्ट आहे. लहानपणापासूनच रुबलने प्रत्येक मुलाला शाळेत जावे असे स्वप्न पाहिले होते. आता, ती बक्षीस रकमेचा वापर अशा संस्था उघडण्यासाठी करेल ज्या मोफत व्यावसायिक प्रशिक्षण देतील आणि मुलांना स्वावलंबी बनवतील. युनेस्कोच्या असोसिएट जनरल डायरेक्टर स्टेफानिया गियानिनी म्हणाल्या की, हा सन्मान शिक्षकांमध्ये देश बदलण्याचे धाडस असल्याचे दर्शवितो. रुबल हा पुरस्कार जिंकणारी १० वी शिक्षिका आहे.

गेल्या दोन दशकांमध्ये, नागी यांनी पारंपारिक वर्गखोल्यांच्या पलीकडे जाणारी एक तळागाळातील शिक्षण चळवळ उभारली आहे. त्यांच्या रूबल नागी आर्ट फाउंडेशन द्वारे, त्यांनी भारतातील १०० हून अधिक वंचित समुदायांमध्ये ८०० हून अधिक शिक्षण केंद्रे स्थापन केली आहेत.

नागीचे शिक्षण मॉडेल गरिबी, बालमजुरी, बालविवाह, अनियमित उपस्थिती आणि मूलभूत पायाभूत सुविधांचा अभाव यासारख्या उपेक्षित समुदायांना भेडसावणाऱ्या वास्तवांभोवती डिझाइन केलेले आहे. तिचे कार्यक्रम लवचिक वेळापत्रक, पुनर्वापर केलेल्या साहित्याचा वापर करून प्रत्यक्ष शिक्षण आणि शिक्षण प्रासंगिक आणि सुलभ ठेवण्यासाठी व्यावहारिक कौशल्य निर्मितीवर अवलंबून असतात. फाउंडेशनच्या मते, या हस्तक्षेपांमुळे गळतीचे प्रमाण ५० टक्क्यांहून अधिक कमी झाले आहे आणि दीर्घकालीन शाळेत टिकून राहण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या सुधारले आहे. तिने ६०० हून अधिक स्वयंसेवक आणि पगारी शिक्षकांना प्रशिक्षण दिले आहे, ज्यामुळे स्थानिक गरजांशी जुळवून घेणारे एक स्केलेबल मॉडेल तयार झाले आहे जे सातत्यपूर्ण शिक्षण चौकट राखते. नागी म्हणाली आहे की ती बक्षीस रकमेचा वापर एक प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यासाठी करणार आहे जी मोफत व्यावसायिक आणि डिजिटल साक्षरता कार्यक्रम देईल, तिचे काम मूलभूत शिक्षणाच्या पलीकडे रोजगारक्षमता आणि जीवन कौशल्यांपर्यंत वाढवेल. शिक्षण क्षेत्रात नाविन्य स्वीकारणे ही आता चैनीची गोष्ट नसून, विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि जागतिक पातळीवर स्पर्धा करण्यासाठी एक अपरिहार्य गरज बनली आहे, हे रूबल नागी यांनी दाखवून दिले आहे.

# जि.प.शाळांमधील ३००० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेच्या पुस्तकांचे मोफत वाटप

## जिल्हा प्रशासनाचा स्टेट बँकेच्या सहकार्याने उपक्रम



ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – शिष्यवृत्ती परीक्षेत गरीब कुटुंबातील मुले केवळ अभ्यासक्रमाची पुस्तके नसल्याने मागे पडतात. अशा ३००० विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने शिष्यवृत्ती परीक्षेची पुस्तके विनामूल्य उपलब्ध करुन दिली आहेत. त्यासाठी भारतीय स्टेट बँकेच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून निधी दिला आहे.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते काल (दि.१०) ह्या पुस्तकांचे वितरण करण्यात आले. जैन इंटरनॅशनल स्कूल येथे हा कार्यक्रम पार पडला. स्टेट बँकेचे क्षेत्रिय प्रबंधक त्रिभुवन, पुस्तकाचे लेखक हर्षवर्षन सूर्यवंशी, शिक्षणाधिकारी प्राथमिक जयश्री चव्हाण, जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य राजेंद्र कांबळे, उपशिक्षणाधिकारी गीता तांदळे, क्रांती धसवाडिकर, आर. व्ही. ठाकूर, ए.सी. कापसे तसेच शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी आदी उपस्थित होते.

ग्रामिण भागात शिकणाऱ्या जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षा देण्यासाठी अभ्यास व सराव करण्यासाठी ही पुस्तके खास तयार करण्यात आली आहेत. ही पुस्तके वापरुन झाल्यावर पुन्हा जमा करण्यात येतील. पुढल्या वर्षी अन्य विद्यार्थ्यांना देण्यात येतील.

जिल्हाधिकारी स्वामी यांनी उपस्थितांशी संवाद साधतांना सांगितले की, केवळ तीन हजार विद्यार्थ्यांना ही पुस्तके देण्यात येत आहेत. आणखी मदत मिळाल्यास जास्त पुस्तके उपलब्ध करता येतील. विद्यार्थ्यांनी या पुस्तकांचा सदुपयोग करुन सुव्यवस्थितपणे शाळेला परत करावीत. शिष्यवृत्ती परीक्षेसाठी शिक्षक वृंद सतत मार्गदर्शन करीत असतो. शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्ह्यातील विद्यार्थी चांगले यश संपादन करीत आहेत. ही अभिमानाची बाब आहे. याच विद्यार्थ्यांमधून उद्याचे नागरिक घडणार आहेत. त्यामुळे या उपक्रमाचे आगळे वेगळे महत्त्व आहे. पुस्तकाचे लेखक हर्षवर्धन सूर्यवंशी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक जयश्री चव्हाण यांनी तर सूत्रसंचलक आर. व्ही. ठाकूर यांनी केले. गीता तांदळे यांनी आभार मानले.

# संध्यामग्न : अनोळख्या वाटेवर

ज्योतिर्मय साहित्य



पावलांच्या सरावात आलेली आणि डोळ्यांच्या परत परत पाहण्यात आलेली अशीच वाट असते ओळखीची वाट. पण ज्या वाटेवर कधी पावलं पडली नाहीत अन् डोळ्यांच्या दृष्टिक्षेपातही नाही अशीच ती असते अनोळखी वाट.

त्या दिवशी मी असाच गाडी चालवत होतो. संध्याकाळची वेळ. संध्यामग्न असलेली वाट ओळखीची नव्हती. आणि तीही जास्त ओळखीची नव्हती. पण ती सोबत होती. कानात काहीतरी बोललेलं ऐकू येत होतं. तिचं बोलणं गोड परंतु स्पष्ट वास्तविक वाटत होतं. मी काहीतरी उत्तरं देत होतो. ती आणखी बोलावी, पुढे बोलावी म्हणून.


अनोळखी रस्त्याकडे मी पाहत नव्हतो तसाच तिच्याकडे पण. कां तिच्यामुळे मी रस्त्याकडे पाहत नव्हतो ? माझं स्वतःवरच लक्ष उडालं होतं. कारण अनोळखी वाट, आणि जराशी ओळखीची ती. फारसं काही माहिती नाही. गाडीच्या पायाखालून वाट जात होती. माझ्या कानातून डोक्यात आणि डोक्यातून काळजात शब्द जात होते. या वाटेला चालतं आणि तिला मी बोलतं करत होतो इतकेच.

अनोळखी वाटेचा अन् स्पर्श झाला का नाही हेही लक्षात नाही. स्पर्शाचेही भान उरले नव्हते. फक्त अस्तित्व होते दोन हृदयांच्या संवादाचे. काय करायचे रस्त्याने कोणी जात असेल? काय करायचे कोणी पाहत असेल? खुशाल पाहू देत. पहिल्यांदा बोलणं आणि अनोळखी वाटेवर चालणं असंच असतं. त्यात संध्यामग्न निसर्गाची साथ. झाडं स्तब्ध शांत स्थितप्रज्ञाप्रमाणे उभी.

अनोळखी वाटेवर वेळेचं भान नसावं हे किती आल्हाददायक. म्हणूनच ती वाटही संपू नये वाटत होतं आणि ती वेळही हातातून निसटून जाऊ नये. खरंतर न पाहता परंतु सोबत असताना झालेला संवाद हृदयाचा हृदयाशी थेट संवाद असेच म्हणावे लागेल. मी वळून पाहिलं नाही आणि माझा चेहरा तिला दिसत नव्हता. हृदयापर्यंत पोहोचलेल्या शब्दांच्या स्पंदनावरच ते क्षण चालत होते.

स्थितप्रज्ञ शांत उभी झाडं, थांबलेला निसर्ग. अनोळखी रस्ता. त्यावर चालू होती फक्त दोन अनोळखी हृदयांची स्पंदनं. मी आपण काय बोललं आणि कानाने काय ऐकलं नंतर काहीच लक्षात नाही. एक निरपेक्ष, निस्मृत, निःशंक, निरागस, निखळ संवाद. नीरव शांतता जणू गोंदून घेत होती स्वतःच्या मन: पटलावर हा निखळ संवाद.

तिचा आणि त्या अनोळखी वाटेचा मला आठवत नाही मी पत्ता विचारला होता की नाही. पण एका ठिकाणी आल्यावर मला ध्यानावर आणणारे इशाऱ्याचे, सोज्वळ आदेशाचे तिचे शब्द कानावर पडले. आणि नकळत थांबावे लागले. अनोळखी वाटेवर (आम्ही) थांबलो. धन्यवाद!इथून मला जाता येईल. असे म्हणून ती निघाली. शब्दातून भाव उमटत होते. चेहरा पाहायची गरज भासली नाही.



बलराज संघई

छत्रपती संभाजीनगर मो. 9420015108

निरव शांततेत मी तिच्या जाणाऱ्या आकृतीकडे पाहत होतो. ती ओळखीची वाट चालत होती आणि मी अनोळखी वाटेवर स्तब्ध होतो. तिच्या शब्दांच्या ऐवजी आता तिच्या पायातील पैंजणांचा मंजुळ आवाज कानावर पडत होता आणि हळूहळू तो क्षीण होत होता. आता तो रस्ता, जाणारी ती आणि पैंजणांचा मधुर ध्वनी सर्वच संध्यामग्न.

मात्र जाताना मला रस्ता ओळखीचा पण क्रूर वाटत होता. संध्यामग्न उदासीला जड झालेली पावलं. अशीच गाडी चालवत, संध्यामग्न असा मी परतत होतो.

***






दुकान भाड्याने देणे आहे.

300 स्वेअर फूट दुकान भाड्याने देणे आहे.
डॉक्टरांना प्राधान्य.
इंदुगंगा आर्केड,
राहुल मेडिकलच्या बाजूला,
क्रिकेट स्टेडियम जवळ,
एन 2, मेन रोड,
सिडको छ. संभाजीनगर

संपर्क :
9823195585/ 8149998143




## जात्यावरच्या ओव्या......

बाई, आडाच पाणी
अस थंड थंड गार
तृप्त झाले जन
जशी अमृताची धार ||४९४||

आडाच्या पाण्याला
देवाजीच झाकण
तुमच्या परीस
कोण करील राखण? ||४९५||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# समर्थ रामदास आणि श्रीराम




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२


ज्योतिर्मय साहित्य

भारतभ्रमण करतेवेळी हिमालयात समर्थांना प्रभू रामचंद्रांचे दर्शन घडले. श्रीरामांकडून त्यांना धर्माच्या रक्षणासाठी कार्य करावे अशी प्रेरणा मिळाली होती. पुढे श्रीनगरमध्ये त्यांची भेट शिखांचे सहावे गुरु हरगोविंदसिंग यांच्याशी झाली. हरगोविंदसिंग आपल्याबरोबर दोन तलवारी बाळगत असत. शिवाय त्यांच्याजवळ सशस्त्र अशी फौज असे. हे पाहून समर्थांना आश्चर्य वाटले. त्यांनी त्याचे कारण विचारले. तेव्हा हरगोविंदसिंग म्हणाले, एक तलवार स्वसंरक्षणासाठी आणि दुसरी तलवार स्त्रियांच्या शील रक्षणासाठी आणि माझ्याजवळ असलेला फौजफाटा धर्माच्या रक्षणासाठी. जगात दुर्बलांना काही किंमत नसते. आपले संरक्षण आपल्याला करता आले पाहिजे. समर्थ त्यांच्या या विचारांनी प्रभावित झाले. यानंतर पुढे ते त्यांच्यासोबत सुवर्णमंदिरात गेले. आपल्यालाही धर्मरक्षण करावयाचे असेल तर काय केले पाहिजे याचा अंदाज समर्थांना आला. त्यानंतर ते स्वतःजवळ शस्त्र बाळगू लागले. त्याला ते गुप्ती म्हणत. त्यांच्या जप करण्याच्या कुबडीत एक तलवार लपवलेली असे. आपल्या शिष्यांनाही समर्थांनी स्वाभिमान, स्वत्व आणि सामर्थ्याचा संदेश दिला. दृढनिश्चयी, पोलादी आणि कणखर मनगटाचे आणि मनाचे शिष्य तयार केले.



समर्थांच्या घराण्यात गेल्या ३२ पिढ्या श्रीरामांची उपासना असली तरी पूर्वीच्या अनेक पिढ्यांपासून विठ्ठलाची उपासना आणि वारकरी परंपरा देखील होती. समर्थ श्रीराम आणि विठ्ठल यांच्यात भेद मानत नव्हते. दोन्हीही श्रीविष्णूचीच रूपे. परंतु मोगलांच्या अन्यायी आणि जुलमी सत्तेचा प्रतिकार तर करायला हवाच होता. विठ्ठलाचे शांत आणि सौम्य रूप लोकांमध्ये अन्यायाविरुद्ध जागृती करण्यासाठी उपयोगी पडणार नाही. प्राप्त काळाचा विचार करताना समर्थांना असे एखादे दैवत हवे होते की ज्यायोगे लोकांच्या मनात अन्यायाचा प्रतिकार करण्याची उर्मी जागृत होईल. स्वत्व आणि स्वाभिमान जागृत होईल. गुलामगिरीची वृत्ती अंगी भिनलेल्या आणि शक्तिहीन झालेल्या समाजाला नवचैतन्य देईल अशा देवतेची उपासना त्यांना हवी होती.

त्यांना त्याचा साक्षात्कार श्रीरामांच्या उपासनेत झाला. कोदंडधारी राम त्यांना आदर्श वाटला. अन्यायी, अत्याचारी अशा रावणाचे पारिपत्य करून त्याच्या बंदिवासात असलेल्या देवांना ज्याने मुक्त केले तो श्रीराम म्हणजे देवांचा देव. त्याला साह्य करणारा हनुमंत म्हणजे बल, बुद्धी, चातुर्य, स्वामीनिष्ठा आणि भक्तीचे प्रतीक. हातात शस्त्र घेऊन राक्षसांचे पारिपत्य करणारी आणि अभय देणारी तुळजाभवानी ही दैवते समर्थांना त्या काळाच्या दृष्टीने आदर्श वाटली. त्यांच्याच उपासनेचा आदर्श लोकांसमोर ठेवण्याचा त्यांनी निर्धार केला. **(क्रमशः)**








आजच्याच दिनी । सारेच संपले ।
समर्थ ते गेले । निजधामी ॥१॥
सज्जनगडात । कल्लोळ जाहला ।
सर्वत्र दाटला । अंध:कार ॥२॥
पुन्हा ना होणे । ऐसे रामदास ।
वाहतो तयांस । श्रद्धांजली ॥३॥
🙏🙏🙏🙏🙏🙏🙏

© माधव मनोहर जोशी.

# लोकांचे मन दुखविणे ही हिंसाच !



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

ही जी सृष्टी भगवंताने उत्पन्न केली आहे तिची नक्कल म्हणजे चित्रकला होय. चित्रकाराने रंगविलेले चित्र खोटे असून जे खऱ्यासारखे भासते, त्याला उत्तम चित्र असे म्हणतात. भगवंताचे होऊन जी कला येईल ती खरी. भगवंताने आपल्याकडून जे करवून घेतले ती कला समजावी. जे कर्म भगवंताकडे न्यायला मदत करते ती कलाच होय. या कलेमध्ये मनाला गुंतविणे आणि उद्योगात राहणे ही भगवत्सेवाच आहे. मन म्हणजे कल्पनांचे मूर्त स्वरूप. मन चंचल आहे तोपर्यंत देहालासुद्धा स्वस्थता नाही. मनाची चलबिचल होते म्हणूनच अभ्यास करायला पाहिजे. मनाला शिक्षण देणे याचे नाव अभ्यास करणे. मनाची विश्रांती हीच खरी विश्रांती होय.

सृष्टीमध्ये सर्व ठिकाणी वैचित्र्य आढळते. प्राण्यांच्या कितीतरी जाती आहेत. माणसेसुद्धा एकासारखी एक कुठे असतात ? पण सर्वांमध्ये भगवंत मात्र सारखाच ओवलेला आहे. जगामधले प्राणी एकमेकाला मारक असूनदेखील कसे जगतात, हे पाहिले म्हणजे आश्चर्य वाटते. जगामध्ये माणूस आणि वाघ दोघेही राहतात. परंतु दोघांनाही एकमेकांची भीती असते, म्हणून एक दुसऱ्याला सहसा मारीत नाही. ज्याच्यामुळे दुसऱ्याच्या हिताचा घात होतो, अशा कृती करणे हे हिंसेचे लक्षण समजावे. भगवंताच्या आड येणाऱ्या वस्तूंची हिंसा करणे ही अहिंसाच होय. पण आपल्या स्वार्थाकरिता आणि बडेजावाकरिता लोकांचे मन दुखविणे, ही हिंसाच समजावी. दुसऱ्याचे मन दुखविणे म्हणजे भगवंताचे मन दुखविणे होय. आपल्या मनात आलेली गोष्ट आपल्या हातूनसुद्धा होत नाही, तर मग इतरांनी आपल्या मनासारखे वागावे असे म्हणणे, हे काही बरोबर नाही. आपल्याकडे बायका चातुर्मासामध्ये नियम करतात; उदाहरणार्थ, रोज एक वात लावायची, उजव्या हाताने पाणी प्यायचे, वगैरे. वास्तविक हे कसले नियम ! तुम्ही एक वात लावली काय आणि दोन वाती लावल्या काय, शेवटी दिवा लावावा लागतोच ! त्यापेक्षा, ‘ मी कुणाचे अंत:करण दुखविणार नाही ’ असा नियम करावा. प्रथम चार महिने करावा आणि मग वर्षभर पाळावा आणि नंतर जन्मभर ठेवावा. काही बायका चातुर्मासात मीठ सोडतात. असे अळणी खाणारी बाई जेवायला बसली असताना मीठ वाढायला आलेल्या बाईला दुरूनच ‘ नको नको ’ म्हणते; कारण न जाणो, चुकून मीठ किंवा मिठाचा पदार्थ पानात पडायचा ! हे जसे ती सांभाळते, त्याप्रमाणे आपण कुणाचे अंत:करण न दुखवण्याचा नियम केला की, आपण किती बेताने बोलू आणि कोणी आले तर आपण किती काळजीपूर्वक वागू! भगवंत चोहोकडे आहे असे आपण म्हणतो, पण त्याप्रमाणे वागत नाही, याला काय करावे ? भगवंताचे होऊन त्याच्या नामात राहावे हाच एक उत्तम मार्ग आहे. अंतःकरण न दुखवता बोलणे, हे वाचेचे तप आहे असे म्हणतात.

## श्री क्षेत्र नैमिष्यारण्य भागवत कथा व हरिनाम सप्ताह

भागवत कथाकार :
आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर
कथेचे श्रवण करताना धावते संकलन
मधुकर बोरीकर 9403061886

### ♦दिवस पहिला♦

*पुढे.......*

*गत जन्मातील दोषामुळे आपण या जन्मात ते दोष घेऊन येतो. हे दोष असताना परमात्म्या पर्यंत आपण जाऊ शकत नाहीत. आपल्याला प्रयत्नाने दोष घालवायला लागतात. प्रयत्नाने परमार्थ होतो प्रारब्धाने होत नाही.*

*लोक म्हणतात देव दर्शना साठी आम्हाला देवाने बोलाविले नाही. देव का त्याला बोलावेल? त्याला काय गरज? आपण मोठे गुणांची खाण?*

*आम्हाला गुण मिळविता आले पाहिजेत व दोष घालविता आले पाहिजेत तर परमार्थ साधतो.*

*तू वनवासात जा असे रामाला सांगण्या साठी कैकयीने, सुमंताकरवी रामास बोलावू पाठविले. सुमंत सरळ रामाच्या महालात घुसू शकले नाहीत. त्यांना 14 दरवाजे ओलांडावे लागले. त्यातील पहिले 7 दरवाजे दोषांच्या त्यागाने व नंतरचे 7 गुण मिळवण्याचे. पहिल्या दारा पाशी रथ (वेग, आराम) आरामात परमार्थ होत नाही. कष्ट घ्यावे लागतात. आम्ही ज्ञानेश्वरीचे एक पारायण केले नाही की ज्ञानेश्वराचे मांडीस मांडी लाऊन बसण्याची आमची तयारी असते. हळू हळू परमार्थत मार्ग क्रमांवा लागतो.*

*जन्मो जन्मी आम्ही बहू पुण्य केले...*

*एक भक्त झाडाखाली बसून भगवंताची प्रार्थना करित होता तो वयाच्या 10 व्या वर्ष पासून 90 वर्ष पर्यंत तो हेच करीत होता. इतके करुनही त्याची भगवंताची भेट झाली नाही. एकदा नारद मुनी त्यास भेटले. तो नारदांना म्हणाला" देवास विचारा, मला देव कधी भेटेल" नारद भगवंतास भेटतात व त्यांना त्या भक्तांचा प्रश्न विचारतात. भगवंत म्हणाले "तो ज्या झाडाखाली बसलाय, त्या झाडाला जितकी पाने असतील तितकी वर्षे लागतील".*

*नारदाना वाटले याला हे कसे सांगू? एखादे वेळी हा पळून जाईल. सांगावे की नाही. पण भक्ताने नारदा चे उत्तर ऐकून नाचू लागला. तो म्हणे आता निश्चिती तर झाली! मला भगवंत केंव्हाही केंव्हा भेट देतीलच.* *क्रमश: .......*




## दररोजच्या छोट्याछोट्या सवयी आरोग्यावर मोठा परिणाम करू शकतात !

ज्योतिर्मय साहित्य

आपण अनेकदा काही गोष्टी सहजपणे करतोलघवी थांबवणं, अंथरुणावर मोबाईल ठेवणं, जेवताना पाणी गिळणं. पण यामागे शरीरावर होणारे दुष्परिणाम खूप गंभीर असू शकतात. आरोग्यविषयक वैज्ञानिक संशोधन आणि तज्ज्ञांच्या निरीक्षणातून सिद्ध झालेल्या अशा ८ घातक सवयी तुमच्या शरीरावर हळूहळू घात करतात, हे जाणून घ्या आणि वेळेत सावध व्हा !

लघवी थांबवणं : ही सवय किडनीवर ताण आणते. दीर्घकाळ लघवी रोखल्यास मूत्रपिंडात जंतुसंसर्ग होण्याचा धोका वाढतो. परिणामी, युरिनरी ट्रॅक्ट इन्फेक्शन () होऊ शकतो. विशेषतः महिलांनी ही सवय टाळणं अत्यंत महत्त्वाचं आहे.

सतत बोटं मोडणं : बोटं मोडताना जो आवाज होतो, तो बुडबुड्यांच्या फ ुटण्यामुळे असतो. परंतु ही सवय सातत्याने केल्यास सांध्यांभोवतीच्या स्नायूंवर ताण येतो. यामुळे भविष्यात सांधेदुखी किंवा वयापूर्वी सांधे झिजण्याचा धोका निर्माण होतो.

जेवताना भरपूर पाणी पिणं : अन्न खात असताना जास्त पाणी पिल्यास पचनरस विरळ होतात आणि पचनक्रिया मंदावते. त्यामुळे अन्न पचन नीट होत नाही, गॅसेस, अपचन, पोट फुगण्याची समस्या जाणवू शकते.

सतत सलग बसून राहणं : ऑफिसमध्ये किंवा घरी तासन् तास बसून राहणं आरोग्यास अत्यंत घातक आहे. यामुळे रक्तप्रवाह मंदावतो आणि शरीरात रक्ताच्या गाठी ( ) निर्माण होण्याचा धोका वाढतो, ज्याचा परिणाम थेट हृदयावर होतो.

फोन उशाखाली ठेवून झोपणं : मोबाईलमधून होणारे रेडिएशन मेंदूवर परिणाम करतात. झोपेच्या वेळेस फोन डोक्याजवळ ठेवल्यास झोपेची गुणवत्ता बिघडते, डोकेदुखी, मानसिक अस्वस्थता, आणि थकवा वाढतो.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

खूप गरम अन्न खाणं : खूप तापलेल्या अन्नाचा थेट संपर्क अन्ननलिकेशी होतो आणि त्यामुळे ती जळते. दीर्घकाळ ही सवय राहिल्यास अन्ननलिकेच्या पेशींमध्ये बदल होऊन कॅन्सरचा धोका निर्माण होतो.

कानात कापसाचे बड्स वापरणं : आपण समजतो तितके हे निरुपद्रवी नाहीत. वारंवार वापर केल्यास कानाच्या आतील भागाला इजा होते आणि ऐकण्याची क्षमता कमी होऊ शकते. यामुळे ऐकू येण्यात अडथळा निर्माण होतो.

पोटावर झोपणं : ही झोपेची चुकीची पद्धत असून त्यामुळे मणक्यावर अनावश्यक ताण येतो. पाठदुखी, मणक्याचा वेदना, झोपेत वळण घेण्यास त्रास अशा समस्या उद्भवू शकतात.

निष्कर्ष : हे सर्व मुद्दे लहान वाटले तरी त्यांच्या दुष्परिणाम खूप मोठे आणि दीर्घकालीन असतात. जर आपण आरोग्याकडे गांभीर्याने पाहत असाल, तर या सवयी आजच बदलवा आणि शरीरासोबत मनालाही स्वस्थ ठेवा.

***



## लघु बोधकथा

### ♦श्रमाचे मोल♦

*गुर्जर नरेश सम्राट कुमार पटलचे गुरु आचार्य हेमचंद्र यात्रेहून राजधानीचे शहर पाटणकडे चालले होते. वाटेत त्यांनी एका गावात रात्रीचा मुक्काम केला. तेथे एका गरीब विधवा महिलेच्या घरी ते राहिले होते. त्या महिलेने श्रद्धापूर्वक आचार्यांचे आदरातिथ्य केले. तिच्याकडून शक्य तितके चांगले जेवण दिले. ते मोडकेतोडके घर आचार्यांना महालाप्रमाणे भासले. दुस-या दिवशी जेव्हा आचार्य मार्गस्थ झाले. तेव्हा त्या महिलेने आचार्यांना स्वत:च्या हाताने कातलेल्या सुताची रजई भेट दिली. आचार्यांनी ती रजई पांघरूनच नगरात प्रवेश केला. सम्राट कुमार पटल यांनी गुरुंचे स्वागत केले, परंतु त्यांच्या अंगावरील सुताची रजई पाहून त्यांना वाईटही वाटले. सम्राट म्हणाले,''गुरुवर्य, ही जाडीभरडी रजई एखाद्या सम्राटाच्या गुरुच्या अंगावर शोभून दिसत नाही. तुम्हाला खरेतर सुख आणि शोभा यांची गरज नाही पण माझ्या गुरुच्या अंगावर मौल्यवान उत्तरीय असण्याऐवजी हे जाडेभरडे वस्त्र कसेतरीच दिसते.'' आचार्य हेमचंद्र यांना सम्राटाचा अहंकार त्याच्या बोलण्यात दिसून आला. आचार्य म्हणाले,'' राजा, या रजईमागे अनेक लोकांचे परिश्रम जोडले गेले आहेत. मला त्या परिश्रमांची ऊब हवी आहे. परिश्रम हा खरेतर आपला अभिमान असायला हवा आहे. शिवाय त्या गरीब भगिनीने ज्या प्रेमाने ही रजई मला भेट दिली आहे ती भेट मला तुमच्या मौल्यवान उत्तरीयापेक्षाही जास्त किंमती वाटते.'' आचार्यांच्या उत्तराने सम्राटाचा अहंकार गळून पडला व त्याने आचार्यांची माफी मागितली.*

*तात्पर्य– परिश्रमातून साकार झालेली कोणतीही गोष्ट अतिशय मौल्यवान असते.*

# डिजिटल युगात संगणक महाग; सर्वसामान्य ग्राहक अडचणीत

## रॅम, व एसएसडी मध्ये ४००% दरवाढीचा थेट परिणाम बाजारपेठेवर

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - संगणक व लॅपटॉपसाठी अत्यावश्यक असलेल्या रॅम आणि एसएसडी या प्रमुख घटकांच्या किमतीत गेल्या काही महिन्यांत ४००% वाढ झाली आहे. या दरवाढीचा थेट परिणाम देशभरातील संगणक बाजारपेठेवर झाला असून, परिणामी लॅपटॉप आणि डेस्कटॉप संगणकांचे दर वाढले आहेत.

देशात डिजिटल शिक्षण, ऑनलाइन व्यवहार, आयटी सेवा तसेच औद्योगिक क्षेत्रात संगणकाचा वापर सातत्याने वाढत असताना, वाढलेल्या किंमतींमुळे सर्वसामान्य ग्राहक, विद्यार्थी आणि लघुउद्योगांवर आर्थिक ताण वाढला आहे. व्यापारी सूत्रांच्या माहितीनुसार, मागील काही महिन्यांत लॅपटॉप व संगणकांच्या किमतींमध्ये सरासरी ५ ते १५ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे.

विशेषतः ३० ते ५० हजार रुपयांच्या बजेटमधील लॅपटॉप, विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त मॉडेल्स तसेच कार्यालयीन वापरासाठीचे संगणक या श्रेणीत दरवाढ अधिक जाणवत आहे. दिल्ली, मुंबई, पुणे, बंगळुरू यांसारख्या महानगरांसह मराठवाडा, विदर्भ व उत्तर भारतातील ग्रामीण भागातही या दरवाढीचा परिणाम स्पष्टपणे दिसून येत आहे असे प्रतिपादन श्रीजी कॉम्प्युटर्स अॅन्ड टेकनिकल सेर्विसेसचे संचालक तथा संगणक तज्ज्ञ अशोक गुरनाळे यांनी केले आहे.

दरवाढीची प्रमुख कारणे

१) जागतिक सेमीकंडक्टर पुरवठा साखळीतील तणाव :



अशोक गुरनाळे
सदस्य : असोसिएशन ऑफ कॉम्प्युटर ट्रेडर्स
संचालक : श्रीजी कॉम्प्युटर्स अॅन्ड टेकनिकल सर्विसेस

रॅम, एसएसडी व प्रोसेसर हे घटक सेमीकंडक्टर आणि चीप उद्योगावर आधारित आहेत. तैवान, चीन, दक्षिण कोरिया व अमेरिका येथे होणाऱ्या उत्पादनावर कोविडनंतरचे अडथळे, वाहतूक खर्चात वाढ व पुरवठा साखळीतील समस्या यांचा परिणाम झाला असून, त्यामुळे घटकांची उपलब्धता कमी होऊन दर वाढले आहेत.

२) एआय व डेटा सेंटर्समुळे वाढती मागणी :

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), क्लाउड कंप्युटिंग व डेटा सेंटर्सच्या झपाट्याने होणाऱ्या विस्तारामुळे उच्च क्षमतेची रॅम, वेगवान एसएसडी व प्रगत प्रोसेसरची मागणी वाढली आहे. यामुळे ग्राहक बाजारासाठी उपलब्ध घटक कमी पडत असून किंमती वाढत आहेत.

३) कच्च्या मालाच्या किंमतीत वाढ :

सेमीकंडक्टर आणि चीप निर्मितीसाठी लागणाऱ्या सिलिकॉन, तांबे, कोबाल्ट आदी खनिजांच्या जागतिक किमती वाढल्याने उत्पादन खर्चात वाढ झाली असून, त्याचा भार ग्राहकांवर टाकला जात आहे.

४) डॉलरच्या विनिमय दराचा परिणाम :

भारतात संगणक घटकांचा मोठा वाटा आयातीवर अवलंबून आहे. डॉलरच्या तुलनेत रुपयाच्या विनिमय दरातील बदलामुळे आयात खर्च वाढून संगणक महाग झाले आहेत.

५) जीएसटी व आयात शुल्क :

इलेक्ट्रॉनिक वस्तूंवरील जीएसटी, आयात शुल्क व वाहतूक खर्चामुळे भारतातील अंतिम किंमती वाढत आहेत.

शिक्षण क्षेत्रावर मोठा परिणाम

डिजिटल शिक्षण, ऑनलाइन वर्ग व स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांना लॅपटॉप अनिवार्य झाला आहे. मात्र वाढलेल्या किमतींमुळे ग्रामीण व मध्यमवर्गीय कुटुंबांवर आर्थिक ताण वाढला आहे. मराठवाड्यातील अनेक पालकांनी सांगितले की, ''शिक्षणासाठी संगणक गरजेचा असताना किंमत वाढल्याने खरेदी करणे कठीण झाले आहे.''

लघुउद्योग व व्यावसायिकांनाही फटका

लघुउद्योग, कार्यालये, कोचिंग क्लासेस व डिजिटल व्यवसायांसाठी संगणक अत्यावश्यक असतानाही, दरवाढीमुळे नवीन खरेदी पुढे ढकलली जात आहे तसेच अपग्रेडचा खर्च वाढला आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, नांदेड व लातूर येथील विक्रेत्यांच्या मते विद्यार्थ्यांची मागणी कायम असली तरी ग्राहक स्वस्त पर्यायांकडे वळत आहेत.

पुढील काळात दर कमी होणार?

तज्ज्ञांच्या मते, येत्या काही महिन्यांत रॅम व एसएसडीच्या दरात काही प्रमाणात स्थिरता येण्याची शक्यता असून, उत्पादन क्षमता वाढवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

# श्रीयश संस्थेत राज्यस्तरीय पोस्टर व मॉडेल मेकिंग स्पर्धेचे यशस्वी आयोजन

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : श्रीयश इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च व श्रीयश इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने डी. फार्मसी व बी. फार्मसी विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय पोस्टर कम मॉडेल मेकिंग स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला राज्यातील विविध फार्मसी महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

स्पर्धेसाठी पुढील विषय निश्चित करण्यात आले होते : १. ह्युमन ॲनाटॉमी अँड फिजिओलॉजी

२. फार्मास्युटिकल लॅबोरेटरी इन्स्ट्रुमेंट्स (मॉडेल मेकिंग) ३. फार्माकॉलॉजी- क्लासिफिकेशन विथ मार्केट फॉर्म्युलेशन्स.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्रीयश प्रतिष्ठानचे सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट प्रमुख प्रा. अनिल पालवे, श्रीयश आयुर्वेदिक कॉलेजच्या डॉ. विद्या बडे, तसेच श्रीयश इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्चचे अकॅडमिक डीन डॉ. सुरेश सुडके, प्रा. मीनल चौधरी व प्रा. रश्मी तांबरे उपस्थित



होते. कार्यक्रमास श्रीयश इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्चचे प्राचार्य डॉ. गणेश तापडिया व श्रीयश इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य प्रा. अमोल लोणारकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पोस्टर्स व मॉडेल्सचे बारकाईने परीक्षण करून गुणांकन केले. पोस्टर सादरीकरणाची पद्धत, विषय मांडणी, सर्जनशीलता व व्यावहारिक दृष्टिकोन याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर सूचना दिल्या.

स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे - ह्युमन ॲनाटॉमी अँड फिजिओलॉजी - डी. फार्मसी विभाग प्रथम - अनिकेत साबळे (श्रीनाथ कॉलेज ऑफ फार्मसी)

द्वितीय - वैष्णवी वाघमारे व साक्षी वाघ (श्रीयश इन्स्टिट्यूट ऑफ फार्मा. एज्युकेशन अँड रिसर्च व श्रीयश इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी) तृतीय - मुस्कानबी शेख (औरंगाबाद कॉलेज ऑफ फार्मसी)

ह्युमन ॲनाटॉमी अँड फिजिओलॉजी - बी. फार्मसी विभाग प्रथम - साक्षी व्ही. वाघ (श्रीयश इन्स्टिट्यूट ऑफ फार्मा. एज्युकेशन अँड रिसर्च) द्वितीय - कहकशा शेख अँड ग्रुप (औरंगाबाद कॉलेज ऑफ फार्मसी) तृतीय - सोनाली गोरे अँड ग्रुप (एल. बी. वाय. पी. इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी) फार्मा. लॅबोरेटरी इन्स्ट्रुमेंट्स (मॉडेल मेकिंग) - डी. फार्मसी

प्रथम - वैष्णवी जिवराग (यू.डी.आय.पी.) द्वितीय - अतुल सुसे (श्रीनाथ कॉलेज ऑफ फार्मसी) सांत्वन/विशेष पारितोषिके सिद्धार्थ हटकर (आर.बी.टी. कॉलेज ऑफ फार्मसी) अंकित राठोड (इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, बदनापूर) कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. बसवराज मंगरुळे, मुख्य कार्यकारी अधिकारी निवृत्त कर्नल जॉय डॅनियल तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी यांनी शिक्षकवर्ग व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

**मूल मराठी लेखक-सचिन वसंत पाटील हिन्दी भावानुवाद-डॉ. मीना श्रीवास्तव**

# मेहनत की रोटी

आगे........

घर बेचकर पैसे जुटाने दूर रहे, उससे अधिक तो मानसिक पीड़ा झेलनी पड़ रही थी। जितना सरदर्द बढ़ रहा था, उतनी शराब की लत भी बढ़ती जा रही थी।

घर हाथ से निकल गया, इसलिए बीवी-बच्चे बेघर हो गए। हताशा की पराकाष्ठा हो गई थी। उसकी पत्नी ने अपना सर फोड़ फोड़ कर लहू लुहान कर लिया। बच्चों ने रो रो कर बवाल मचाया। आखिर विनायक ने गांव के बाहर एक बड़ी ही गलिच्छ झुग्गी बस्ती में एक कमरा किराए पर लिया। पत्नी ने टूटे फूटे बर्तनों को जोड़कर किसी तरह अपनी गृहस्थी जोड़ी।

लेकिन इतनी बर्बादी होने पर भी विनायक का सिर अभी भी ठिकाने पर नहीं था। एक दिन वह अपनी पत्नी के गले का हार खींच कर ले गया। उसे सुनार को बेचने पर कुछ पैसे मिले। 'आर या पार' इस अंतिम विचार के साथ उसने वे सारे पैसे मटके में लगा दिए। उसे पूरा यकीन था कि आज मेरा आंकड़ा जरूर लगेगा। उसके एक 'मटकेबाज' दोस्त ने उसे यह 'सलाह' जो दी थी! अब वह नतीजे का इंतजार करने लगा।

दरअसल, आज वह बिलकुल ही नशे में नहीं था। उसकी बेचैनी चरमसीमा पर थी। उसने अपनी पत्नी के सुहाग का अंतिम गहना तक तुड़वा कर जुए में लगा दिया था। अगर आज आंकड़ा लगा तो लाखों रुपये मिलेंगे। अपनी सम्पूर्ण निर्धनता दूर हो जावेगी। बच्चों की परीक्षा की फीस, उनके कपड़े-लत्ते, घर का बाजार-हाट, घरवाली को साडी, और मैं भी टकाटक बनकर रहूँगा। ऐसा लिबास पहनूंगा कि, गांव वाले मुझे पहचान तक नहीं पाएंगे। कमीज पर नए फैशन का जैकेट, पैरों में चमकीले पॉलिश से दमकते चमड़े के भारी जूते........ ऐसा बहुत कुछ तय कर रखा था विनायक ने! अब तो बस जेब गर्म होने की देरी थी! .....लेकिन ये तमाम सपने तब सच होंगे, जब आंकड़ा ठीक से बैठेगा........ और अगर न लगा तो? उसका दिमाग ठंडा पड गया। उस डरावनी अवस्था के बारे में वह सोचना तक नहीं चाहता था........ उसकी समूची दुनिया का विध्वंस हो जायेगा। दूसरे दिन की सुबह का उजाला कुछ मटमैला ही लग रहा था......

वह पूरी रात करवटें बदलता रहा। सुबह होते ही बिना एक भी मिनट गंवाए सबसे पहले वह टपरी पर चला गया। बेक़रार दिल की धड़कनें तेज हो गईं थीं। मानों उनकी गिनती लगाते लगाते उसने ललचाई नज़रों से आंकड़े को देखा। वह पूरी तरह से सदमे से हिल गया, जैसे तेजी से बहते पानी के भंवर में उसकी जान फँस गई हो। उसे ऐसा लग रहा था मानों उसके पैरों तले ज़मीन खिसक रही है। उसने लागत का पैसा पूरी तरह खो दिया था। उसके सारे अनुमान बुरी तरह गलत साबित हो गए थे। एक एक पाई आंकड़े के चक्कर में डूब गई थी।

क्रमश : ..........















# सुंदर सगळेच असतात



ज्योतिर्मय साहित्य

तुम्ही तुमचा स्वीकार करा. सुंदर दिसायला, सुंदर राहायला काहीच हरकत नाही.

पण आपण फक्त वय लपवण्यासाठी, जगाला दाखवण्यासाठी हजारो रुपये उधळत असाल. का ? तर आपला नवरा, समाज, यांच्या मनात स्थान मिळवण्यासाठी. तर सॉरी टू से तुमची वैचारिक पातळी तुम्ही मर्यादित ठेवताय.

बॉडी शेमिंग हा प्रकार कित्येक मुलामुलींना न्यूनगंड देऊन जातो. तंदुरुस्त असण जरुर आवश्यक असत. पण काही वेळा हार्मोन्स किंवा मेनोपोज मुळे शरीरात बदल होतात, महिलांचे वजन वाढते. वजनामुळे समस्या निर्माण होतात पण अगदी बारीकच हव म्हणून उपाशी रहायचा पर्याय ही निवडला जातो. जो तुमच्या आरोग्याला घातक असतो. अतिरिक्त व्यायाम जास्त झाल्यामुळे हाडे मुख्यतः चाळीशी नंतर दुखायला लागतात.

चुकीचे पध्दतीने पौष्टीक अन्न शरिरात न गेल्यामुळे केस गळायला लागतात, रक्ताची कमतरता निर्माण झाली की उत्साह न वाटणे, झोप येणे हे देखील होवू लागते. येता जाता समाज जाड लोकांना टोमणे मारतो त्यामुळे नैराश्य ही येऊ लागते. तो ताण असह्य होतो आणि परत खाल्ले जाते.

शरीराला थोडा वेळ द्या. रोज व्यायाम करा पण स्वत:ला स्वत:ची लाज जी समाजामुळे निर्माण होते ती होवू देऊ नका. बारीक असलकीच सुंदरता गोरं असलं तरच सुंदरता ही कुठली परिमाण आहेत ? जर क्रुष्ण सावळा होता हे सगळ्या गाण्यातून त्याच वर्णन केलं जातं तर इतर महिला सावळ्या असतील, किंवा काळ्या असतील तर त्यांना का डावलल जात ? कारण समाजाने एक चुकीच समीकरण बनवलय, गोरं असलं सुंदर, बारीक असलं, सुंदर मग चेहरा खपाटीला जावून गाल आत जावून, चेहरा तेजहीन दिसला तरी चालेल. आणि कधी म्हातारपण ग्रेसफुली एक्सपेक्ट करणारच नाही का आपण? कशासाठी सतत मेकअपचे थर लावून कायम यंग दिसायचा अट्टाहास?

कुरळे केस असलेले हेअर स्ट्रेट करतात. त्यात असलेले चांगले केस ही गमावून बसतात. इंटरनेट वर रिल्स टाकून अभ्यास सोडून ही पिढी स्वतःचे चेहरे आणि त्यावरच्या पोस्ट

टाकून लाईक्स च्या मायाचक्रात अडकते. हे इतकं महत्वाच नाही सांगणारी आई कडक, बुरसटलेल्या विचाराची वाटू लागते.

शिक्षणाला दिलेले पैसे या अवास्तव खर्चांसाठी वापरले जातात.

घाम गाळून कमावलेले पैसे महागडी क्रीम्स जी एका आठवड्यात तुम्हाला मधुबाला किंवा मुलांनाही मॉडेल बनवणार आहेत. अशा खोट्या जाहिरातीला भुलून वापरली जातात .

भारतात कॉस्मेटिक च्या कंपन्या तुम्ही चांगले दिसा न दिसा पण तुमच्या आवडत्या ऍक्टर्स, एक्टरेस ना ते स्वतः ते क्रिम न वापरून कंपनी व स्वतःचा फायदा करून घेतात.

छान राहणं, छान दिसणं चूक नाही. पण सततच छान दिसलच पाहिजे करत त्याचा अतिरेक करणं, त्यामुळे आपली मानसिक शांती आणि दुसऱ्याची घालवून बसणं हे अयोग्य आहे.

स्किन स्पेशालिस्ट यांचा त्या क्षेत्रात अभ्यास असतो. त्वचेला काही ऍलर्जी झाल्यास तुम्ही डॉक्टर कडे संपर्क करा. ते तुम्हाला योग्य मार्गदर्शन करतात .स्वतः जाहिराती बघून उगाच महागडी क्रीम्स वापरू नका.

यातही अनेक जण किरकोळ कारणासाठी प्लास्टिक सर्जरी हा पर्याय निवडतात .सुरकुत्या दिसत आहेत करा प्लास्टिक सर्जरी हे खूळ खूप मोठ्या प्रमाणात केल्या जात आहेत.

त्यात आधीचा चेहरा बरा होता. असच काहींच्या बाबतीत घडलय. आणी तरी घटस्फोटाच प्रमाण वाढत आहेच म्हणजे स्वभाव, ऍडजस्टमेन्ट ह्या गोष्टी विचारात घेतल्या जातच नाहीत.

ठरावीक लिमिट नंतर काहीच सहन करायच नाही हे योग्य आहेच पण लग्न झाल्यावर पुरुषांना काही वर्षांनी आपली बायको बेढब वाटायला लागते मग तुम्ही लगेच फिट अँड फाईन मुलीच्या प्रेमात पडता आणि इतक्या वर्षांचा गोड संसार मोडता. का?फक्त बाह्य सुंदरतेसाठी. ?

या व्याख्या चुकीच्या आहेत. फिल्म इंडस्ट्रीत किती शरीर दाखवायचे याच्या मर्यादा मोडून टाकल्या आहेत. याचे परिणाम पुढच्या पिढीवर होवून स्त्री म्हणजे फक्त भोगवस्तू हा पांडा महिलाच पाडत आहेत. बेशरमीच्या सगळ्या लिमिट तुम्ही क्रॉस करताय. हे चित्रपट लोकांनीच पाडायला हवेत. म्हणजे कुठेतरी ही शरीर हेच सर्वस्व नाही. अभिनय, कथा हे ही तितकेच आवश्यक आहेत हे लोक निर्दशनास आणून देतील.

सुंदरता प्रत्येकात आहे. कधी ती स्वभावात असते. कधी ती गुणांमध्ये असते. अहो रक्ताची गरज भासली तर तो माणूस किंवा महिला जाड, बारीक, काळे गोरी नाही बघत तेव्हा एकच विचार असतो आपल माणूस मरणाच्या दारातून परत यायला हवा. आणि मेल्यावर तर तुम्हाला तुमच्या नावाने सुध्दा हाक मारत नाहीत.



सौ माधुरी पळणिटकर
पुणे मो. 99214 95533

बॉडी आणा हेच म्हणले जाते. त्यामुळे किती बाह्य सुंदरतेला अवास्तव महत्व द्यायचं ते आपण ठरवायच. एकच म्हणावस वाटत कुणी जाड कुणी काळं असेल तर नका सतत त्यांना बोलून त्यांना अजून इंफुरीटी कॉम्प्लेक्स देवू. तंदुरुस्तीला महत्व द्या. झिरो फिगर, फेअरनेस ही मोजमाप असूच शकत नाहीत. कारण काळा रंग असणं, असणं गुन्हा नाही.

एक मधुर हसरा चेहरा कायम उठून दिसतो. तुमच्या त चांगल्या विचारांचं तेज तुमच व्यक्तिमत्व तेजोमय बनवत. तुम्ही बोलायला सुरुवात केल्यावर तुमच्या विचारांची छाप लोकांना तुमची दखल

घ्यायला भाग पाडते.

लता मंगेशकरांचा चेहरा नाही आवाज जगभरात त्यांचं गानकोकिळा नाव अजरामर करून गेलं.

स्त्री ने मी फक्त शोभेची बाहुली हि स्वतःची ओळख पुसायला हवी.

आदरणीय सुधा मूर्ती याही इतक्या कर्तुत्ववान आहेत. पण कुठेही घमेंडीपणा, पैशाचा दिखावा किंवा पोकळ बढाया नाहीत.

डोळे मिटून मला कोण आठवेल सगळ्यात सुंदर ?सांगू.माझे आई वडील . आई तू जगात सुंदर आहेस हे मी तिचा घाम तिच्याच पदराने टिपत म्हणायची .आणि आई मनापासून हसायची .

तुमची आई सगळ्यात सुंदर व्यक्तिमत्व, मेकअप शिवाय.


आजपासून ज्या तरुणींना वाटेल आपण सुंदर नाहीत . लोकं आपली थट्टा उडवत आहेत. त्यांना ठणकावून सांगा तुमचे डोळे खराब आहेत. कारण मी सुंदर आहेच.

(कुठल्याही पार्लर किंवा त्या क्षेत्रातील माननीय व्यक्ती यांच्याविषयी टीका करण्याचा उद्देश नाही. फक्त पिढीचा विचार बदलण्यासाठी, त्यांना आत्मविश्वास देणे हाच उद्देश )

# रंजक आणि उद्बोधक बालकथासंग्रह : चिंगी आणि जादूचे फुलपाखरू

ज्योतिर्मय साहित्य

कवी तथा लेखक उद्धव भयवाळ लिखित ''चिंगी आणि जादूचे फुलपाखरू'' हा सोहम क्रिएशन अँड पब्लिकेशन,पुणे यांनी प्रकाशित केलेला बालकथासंग्रह नुकताच हाती आला. सौ. स्नेहा गोगटे यांनी चितारलेले पुस्तकाचे देखणे मुखपृष्ठ पाहिल्यावर मुलांना पुस्तक उचलून वाचण्याचा मोह व्हावा असेच ते आहे. पुस्तकात असलेल्या तेरा बालकथा विविध विषय घेऊन गुंफलेल्या आहेत. आतील सजावटही उत्तम आहे. हे लेखकाचे आठवे मराठी पुस्तक असून त्यांनी छोट्या मुलांसाठी कविता इत्यादी विपुल लेखन केलेले आहे. हिंदी भाषेतही त्यांची पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत.




खरे तर लहान मुलांसाठी लिहिणे ही सोपी गोष्ट नाही. त्यांच्या विश्वात जायचे तर त्यांच्या एवढे लहान होता यावे लागते. बालांना रुचेल आणि समजेल अशी सोपी भाषा, सोपी सोपी वाक्ये यांचा वापर करावा लागतो. त्यांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळेल असे विषय निवडावे लागतात. इतकेच नव्हे तर भाषा चित्रदर्शी असावी लागते. अन्यथा द्रुक्श्राव्य माध्यमातून त्यांच्यासमोर गाणी आणि गोष्टींचा मारा होतच आहे. या पडद्यापासून त्यांना दूर ठेवून पुस्तकाकडे वळवणे हे लेखकांसाठी मोठे आव्हान आहे. पुस्तकात रमल्यावर मुलांना बाकी गोष्टींचा विसर पडेल तेव्हाच त्यांना वाचनाची गोडी लागू शकते.

''अनिका आणि अवनी'' या कथेत दोन मैत्रिणींची गोष्ट आहे. ''पाणी वाचवा'' हा संदेश देण्याबरोबरच आपण केवळ बाह्य रूपावरून कुणा व्यक्तीचे मूल्यमापन करायचे नाही असा संदेश ही कथा देते. मैत्री कशी वाढवावी आणि जपावी याचे महत्वही यातून कळते.

''आमच्या शाळेची सहल'' या बालकथेत शाळेच्या लोणावळा आणि राजमाची किल्ला यांच्या सहलीचे मनोज्ञ वर्ण आहे.

सहल जातांना मुलांनी केलेली मौज तसेच प्रत्यक्ष पर्यटनातून त्यांना मिळालेला आनंद याचे वर्णन वाचून मुलांना नक्कीच अशा सहलीला जायला आवडेल.

''अद्भुत दिवाळी'' या कथेत दिवाळीच्या सणातील वेगवेगळ्या दिवसांचे प्रयोजन, कौटुंबिक जिव्हाळ्याचे महत्व प्राणीमात्रांचे प्रेम वाढवण्याची त्या मागची संकल्पना वसुबारस हे सर्व वर्णन केलेले आहे.

''गोपाळला शाळा खूप आवडते'' या कथेत शाळेवर मनापासून प्रेम करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मनोगत आहे.

पुस्तक परीक्षण
डॉ. उर्मिला राघवेंद्र चाकूरकर

हे वाचून मोठ्यांनाही आपले लहानपणीचे शाळेचे दिवस आठवतील.

''चतुर कृष्णा'' ही गोष्ट फुलवली तर मोठी रहस्यकथा मुलांना वाचायला मिळेल. शाळेत झालेल्या चोरीच्या निमित्ताने मुलांची निरीक्षणशक्ती, चौकसपणा यांना असलेले महत्व यातून अधोरेखित होते.

मुखपृष्ठ कथा असलेली ''चिंगी आणि जादूचे फुलपाखरू'' ही कथा मुलांना अद्भुत विश्वात घेऊन जाते.

सुहृदयपणा, दुसऱ्यांना मदत करणे, परोपकार, देशभक्ती, कामसूपणा, नम्रपणा, मैत्री या गुणांचे महत्व ठसवणाऱ्या बालकथा या संग्रहात लेखकाने लिहिलेल्या आहेत. त्या वाचून मुले अंतर्मुख होतील आणि आत्मपरीक्षण करतील हे नक्की.

मोबाईलच्या अति वापराचे दुष्परिणाम ''मोबाईल माझा दोस्त'' या गोष्टीत सांगितलेले आहेत. अभ्यासासाठी मोबाईलचा वापर कसा करून घ्यावा आणि दुष्परिणाम कसे टाळावेत हे यात प्रभावीपणे मांडलेले आहे.

लहान मुलांसाठी रंजक आणि उद्बोधक असणारा हा बालकथासंग्रह आहे.

उद्धव भयवाळ यांना पुढील लेखनासाठी शुभेच्छा देते आणि थांबते.

चिंगी आणि जादूचे फुलपाखरू बालकथासंग्रह

लेखक : उद्धव भयवाळ

प्रकाशक : श्री सुरेंद्र गोगटे, सोहम क्रिएशन अँड पब्लिकेशन, पुणे

पृष्ठसंख्या : ६० मूल्य : १०० रुपये

# कुलस्वामिनी येथे श्री घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग शिवमहापुराण कथेचे भव्य आयोजन

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर : श्री श्याम जनकल्याणार्थ मनुश्री चॅरिटेबल ट्रस्ट, खाटूश्यामजी यांच्या सहकार्याने द्वादश ज्योतिर्लिंग कथा यात्रेच्या क्रमामध्ये शहरात श्री घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग शिवमहापुराण कथेचे भव्य व भक्तिमय आयोजन करण्यात आले आहे.

या पवित्र कथेचे रसाळ कथन राष्ट्रीय कथाकार श्री मनुश्री महाराज (रत्नागडवाले) यांच्या पावन मुखातून होणार असून, भाविकांसाठी ही एक अलौकिक पर्वणी ठरणार आहे.

ही शिवमहापुराण कथा दि. १२ ते १८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत कुलस्वामिनी मंगल कार्यालय, एन-६ बजरंग चौकाजवळ, सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे दररोज संपन्न होणार आहे. या कथेचे थेट प्रक्षेपण संस्कार टीव्ही वाहिनीवर होणार आहे.

महाशिवरात्रीच्या पावन दिनानिमित्त विशेष चार प्रहर शिवाभिषेक धार्मिक विधीही आयोजित करण्यात येणार असून, यामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे.

या शिवमहापुराण कथेचे मुख्य यजमान श्री कृष्णा गायकवाड व सौ. कमल गायकवाड हे आहेत. तसेच, या धार्मिक सोहळ्याच्या प्रारंभी दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० वाजता भव्य कलशयात्रेचे आयोजन बजरंग चौक ते कुलस्वामिनी कार्यालय येथे करण्यात आले आहे. या कलशयात्रेमुळे परिसरात भक्तीमय व आध्यात्मिक वातावरण निर्माण होणार आहे. तरी या पावन प्रसंगी सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिवमहापुराण कथेचा व धार्मिक विधींचा लाभ घ्यावा.

# साहित्यिक म्हणजे कोण रे भाऊ?

ज्योतिर्मय साहित्य

मुंबई : सार्वजनिक वाचनालय, कल्याण आणि स्वामीराज प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने जळजळीत लेखन स्पर्धा घेण्यात येतं आहे व या स्पर्धेचा विषय आहे - साहित्यिक म्हणजे कोण रे भाऊ? विषय विस्तार : साहित्यिक कुणाला म्हणावे? त्याची व्याख्या काय? पुस्तक प्रकाशित झालेलाच साहित्यिक ठरतो का? साहित्यिक ठरवण्याचा अधिकार कुणी कुणाला दिला? पुरस्कार मिळाला हे साहित्यिक असल्याचे प्रमाणपत्र आहे का? एखाद्या साहित्य संस्थेचा सदस्य हाच साहित्यिक किंवा साहित्यिक असलेलाच त्या संघाचा सदस्य होऊ शकतो, हे कितपत योग्य? वाचकांना ''गृहीत धरणे'' कधी थांबणार? वाचकच नसतील तर लिहून उपयोगच काय? ...असे अनेक प्रश्न आहेत. त्यांचा ऊहापोह लेखात व्हावा अशी अपेक्षा आहे. रोख रक्कमेची आकर्षक तीन पारितोषिके, ''सुर्वे मास्तरांचे साहित्य संमेलन'' मध्ये २७ मार्च रोजी पारितोषिक वितरण, तीन मान्यवर वाचकांकडून परीक्षण, शब्द मर्यादा ५०० शब्द, स्पर्धकाने आपला लेख पीडीएफ फॉरमॅट मध्ये swamirajprakashan@gmail.com यावर पाठवायचा आहे व अंतिम तारीख १५ मार्च २०२६ आहे.

# स्वच्छ पर्यावरणासाठी सक्षम अभियानाचा संकल्प!

भारत सरकारच्या ऊर्जा सुरक्षितता, शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या 'सक्षम २०२५-२६ (संरक्षण क्षमता महोत्सव)' हे राष्ट्रीय अभियान १ ते १५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत (तेल आणि गॅस वाचवा, हरित ऊर्जा स्वीकारा)'' या घोषवाक्यासह संपूर्ण देशभर राबविण्यात येत आहे त्यानिमित्त

जागतिक पातळीवर वेगाने बदलणाऱ्या हवामानामुळे आणि वाढत्या प्रदूषणामुळे मानवासमोर आज मोठे आव्हान उभे राहिले आहे. पारंपरिक इंधनांचा वापर दिवसागणिक वाढत गेल्याने निसर्गावर मोठा ताण पडत असून, त्याचे दुष्परिणाम आरोग्य, पर्यावरण आणि अर्थव्यवस्थेवर ठळकपणे दिसू लागले आहेत. भविष्यात हे संकट आणखी भयावह होवू नये यासाठी समाजाने स्वच्छ, शाश्वत आणि पर्यावरणपूरक ऊर्जेकडे प्राधान्याने वळणे, ही काळाची गरज बनली आहे.

कोळसा, पेट्रोल, डिझेल यासारखी पारंपरिक इंधने मर्यादित स्वरूपाची आहेत. त्यांच्या ज्वलनामुळे मोठ्या प्रमाणात कार्बन डायऑक्साइड, कार्बन मोनॉक्साइड आणि इतर घातक वायू वातावरणात मिसळतात. यामुळे जागतिक तापमानवाढ, हवामानातील टोकाचे बदल, पावसाचे असमतोल स्वरूप तसेच आरोग्यविषयक समस्या वाढत आहेत. श्वसनविकार, हृदयविकार आणि त्वचारोग यांसारखे आजार याच प्रदूषणाशी थेट जोडलेले आहेत. यावर उपाय म्हणून नवी ऊर्जा क्रांती आकार घेत आहे. सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, जलविद्युत, बायोगॅस, बायो-इंधन आणि हरित हायड्रोजन यांसारखे पर्याय आज प्रभावीपणे पुढे येत आहेत. या ऊर्जास्रोतांची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे, ते अक्षय आहेत आणि पर्यावरणाला कमीत कमी हानी पोहोचवता. पवन ऊर्जा निर्मितीमुळे इंधन आयातीवरील खर्च कमी होऊन देशाची आर्थिक बचतही होते. ऊसाच्या चिपाडापासून बनविल्या जाणाऱ्या इथेनॉलसारख्या पर्यायी इंधनाकडेही आपला देश गांभीर्याने पाहू लागला आहे.

अलीकडच्या काळाचा विचार केल्यास, वाहतूक क्षेत्रातही मोठे बदल होतांना दिसत आहेत. इलेक्ट्रिक वाहने, हायब्रिड वाहने आणि पर्यायी इंधनावर चालणारी वाहने यांचा वापर वाढत आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत प्राधान्याने स्वच्छ इंधनाचा समावेश केल्यास प्रदूषणावर प्रभावी नियंत्रण मिळवता येऊ शकते. यासोबतच इंधन बचतीच्या सवयी, कार पूलिंग, सायकलचा वापर आणि पायी चालण्यास प्रोत्साहन देणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

घरगुती पातळीवरही स्वच्छ ऊर्जेचा वापर वाढवता येऊ शकतो. सौर पॅनल्सद्वारे वीज निर्मिती, बायोगॅस प्रकल्प, ऊर्जा कार्यक्षम उपकरणांचा वापर आणि विजेचा अपव्यय टाळणे या छोट्या गोष्टी मोठा बदल घडवू शकतात. शाश्वत जीवनशैली स्वीकारणे म्हणजे केवळ पर्यावरणाचे संरक्षण नव्हे, तर पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित भविष्य घडवण्याच्या दृष्टीने या ऊर्जा क्रांतिकडे पाहायला हवे. या दिशेने केंद्र व राज्य सरकारांकडून विविध अभियानांद्वारे जनजागृती केली जात आहे. 'सक्षम'सारख्या मोहिमा नागरिकांना पर्यायी इंधनांचा स्वीकार करण्यासाठी प्रेरित करत आहेत. उद्योग क्षेत्र, तसेच शहरे आणि ग्रामीण भागातही हरित ऊर्जे चा वापर वाढवण्यासाठी धोरणात्मक पावले उचलली जात आहेत. यामध्ये संशोधन, नवतंत्रज्ञान आणि स्थानिक सहभाग आदिला विशेष महत्त्व दिले जात आहे. स्वच्छ पर्यावरण हा केवळ सरकारचा किंवा एखाद्या संस्थेचा विषय नसून, ती प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. आज प्रत्येक स्तरावर घेतलेले छोटे निर्णय उद्याच्या मोठ्या संकटांना टाळू शकतात. पर्यायी ऊर्जेचा वापर, इंधन बचत, वृक्षसंवर्धन आणि पर्यावरणपूरक सवयी अंगीकारल्यास हरित, सुरक्षित आणि समृद्ध भविष्यासाठी आपण भक्कम पायाभरणी करू शकतो. हीच खरी ऊर्जा क्रांती असून तिच्यात आपण सर्वांनी सहभागी होणे, ही काळाची गरज आहे.


पब्लिक नोटीस

पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील सुस येथील सर्व्हे क्रमांक ४२/२ या वडिलोपार्जित जमिनीबाबत झालेल्या गंभीर बेकायदेशीर कृत्यांविरोधात मूळ मालकाच्या वारसांनी मा. मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका (स्टॅम्प) क्र. २०९५/२०२६ दाखल केली आहे.
नमूद मालमत्ता १९३४ मध्ये एका न्यायालयीन सार्वजनिक लिलावाद्वारे कै. लक्ष्मीनारायण रामसुख राठी यांनी कायदेशीररीत्या खरेदी केली होती आणि तशी नोंद तत्कालीन महसूल दप्तरी करण्यात आली होती. तथापि, १९३७ च्या सुमारास तत्कालीन महसूल अधिकाऱ्यांशी संगनमत करून कागदपत्रांमध्ये जाणीवपूर्वक फेरफार करण्यात आले आणि मूळ मालकाचा हक्क डावलून ही जमीन बेकायदेशीरपणे इतरांच्या नावे दर्शवण्यात आली. महसूल विभागाची ही कार्यवाही अधिकार क्षेत्राबाहेरची आणि नैसर्गिक न्यायतत्त्वांच्या पूर्णपणे विरोधात असून, कोणत्याही सक्षम नागरी न्यायालयाच्या आदेशाशिवाय हा फेरफार करण्यात आला आहे.
याच वादाचा फायदा घेत काही बांधकाम व्यावसायिकांनी जमिनीच्या मालकीहक्काबाबतचा प्रतिकूल अहवाल असतानाही प्रशासकीय यंत्रणेची दिशाभूल करून बांधकाम परवानग्या मिळवल्या आहेत. सध्या या जमिनीवर --नावाने अवाढव्य बहुमजली प्रकल्प उभे करण्यात येत असून, या माध्यमातून सर्वसामान्य जनतेची फसवणूक करण्याचा प्रयत्न केला जात आहे. या बेकायदेशीर प्रकल्पांमध्ये गुंतवणूक केल्यामुळे अनेक निष्पाप नागरिकांना याचा फटका बसण्याची आणि त्यांचे आर्थिक नुकसान होण्याची दाट शक्यता आहे. विशेष म्हणजे, या जमिनीची रेरा (RERA) नोंदणी मिळवतानाही वस्तुस्थिती लपवण्यात आली असून, हे संपूर्ण प्रकरण फौजदारी गुन्ह्याच्या स्वरूपाचे देखील आहे. मूळ मालकांच्या घटनात्मक हक्कांचे जतन करण्यासाठी आणि या बेकायदेशीर कृत्यांना रोखण्यासाठी उच्च न्यायालयात धाव घेण्यात आली आहे.
माननीय उच्च न्यायालयाकडे केलेल्या याचिकेद्वारे याचिकाकर्त्यांनी पीएमआरडीए (PMRDA) ने दिलेली बांधकाम परवानगी रद्द करण्याची आणि संबंधित जमिनीवर उभे केलेले बेकायदेशीर बांधकाम जमीनदोस्त करण्याची मागणी केली आहे. तसेच, या प्रकरणात फसवणूक आणि कागदपत्रांमध्ये फेरफार करणाऱ्या संबंधित सरकारी अधिकारी व बांधकाम व्यावसायिकांवर फौजदारी कारवाई करण्याचे आदेश द्यावेत, अशी विनंतीही न्यायालयाला करण्यात आली आहे. अशा बेकायदेशीर प्रकल्पांमध्ये सर्वसामान्य जनतेला आणि त्यांच्या कष्टाच्या पैशाला गुंतवून गुंतागुंत निर्माण होऊ नये, या उद्देशाने ही कायदेशीर दाद मागण्यात आली आहे. जोपर्यंत या प्रकरणाचा अंतिम निकाल लागत नाही, तोपर्यंत सदर जमिनीवर कोणतेही बांधकाम किंवा विक्री व्यवहार करू नयेत, असे अंतरिम आदेश देण्याची विनंती देखील अर्जाद्वारे करण्यात आली आहे.

ॲड. जयराज पांडे
छत्रपती संभाजीनगर
मो. 9226439046


पब्लिक नोटीस

प्रति,
१. मा. जिल्हाधिकारी महोदय, पुणे जिल्हा, पुणे.
२. मा. तहसीलदार महोदय, मुळशी, जि. पुणे.
३. मा. दुय्यम निबंधक महोदय, (नोंदणी व मुद्रांक विभाग), मुळशी/पुणे.
४. मा. तलाठी साहेब, मौजे सुस, ता. मुळशी, जि. पुणे.
संदर्भ - मौजे सुस येथील सर्व्हे नं. ४२/२ या मिळकतीबाबत माननीय उच्च न्यायालयात याचिका दाखल असल्याने कोणत्याही प्रकारच्या फेरफार नोंदी, खरेदी-विक्री व्यवहार, बोजा, हस्तांतरण अथवा अभिलेखात बदल न करण्याबाबत.
महोदय,
मौजे सुस, ता. मुळशी येथील सर्व्हे नं. ४२/२ (क्षेत्र ४ एकर २८ आर) ही मिळकत आमचे पूर्वज कै. लक्ष्मीनारायण रामसुख राठी यांनी १९३४ मध्ये न्यायालयीन लिलावाद्वारे खरेदी केलेली आहे. तथापि, १९३७ च्या सुमारास महसूल अभिलेखात (सातबारा उतारा) बेकायदेशीर फेरफार करून मूळ मालकांचे नाव मालकी हक्काच्या रकान्यातून हटवण्यात आले आहे.
सदर महसूल नोंदींमधील बेकायदेशीर फेरफार, अनधिकृत हस्तांतरण आणि त्या आधारावर बांधकाम व्यावसायिकांनी सुरू केलेले बांधकाम यांविरोधात आम्ही माननीय मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका (स्टॅम्प) क्र. २०९५/२०२६ दाखल केली आहे.
सदर याचिकेमध्ये खालील प्रमुख मागण्या केल्या आहेत:
महसूल अभिलेखातील बेकायदेशीर नोंदी रद्द करून मूळ मालकांची नावे पुन्हा लावणे.
प्रशासनाने दिलेली बांधकाम परवानगी आणि रेरा नोंदणी रद्द करणे.
सदर जमिनीवरील अनधिकृत बांधकाम निष्कासित करणे.
सध्या हे प्रकरण माननीय उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे. जर या काळात सदर जमिनीबाबत नवीन फेरफार नोंदी केल्या गेल्या किंवा खरेदी-विक्रीचे व्यवहार नोंदवले गेले, तर त्यामुळे तिसऱ्या पक्षाचे हितसंबंध निर्माण होऊन प्रकरणाची गुंतागुंत वाढेल. तसेच, सर्वसामान्य जनतेची आर्थिक फसवणूक होण्याची दाट शक्यता आहे.
त्यामुळे माननीय उच्च न्यायालयाचा अंतिम निकाल लागेपर्यंत सदर सर्व्हे नं. ४२/२ च्या सातबारा उताऱ्यावर कोणताही नवीन फेरफार घेऊ नये. ब) सदर मिळकतीबाबत कोणतेही खरेदीखत गहाणखत, किंवा हस्तांतरण दस्त नोंदवू नये.
सदर याचिकेची प्रत या अर्जासोबत जोडली आहे. तरी प्रशासनाने या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून कायदेशीर कार्यवाही करावी.

ॲड. जयराज पांडे
छत्रपती संभाजीनगर
मो. 9226439046

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559